# अजब झाडाच्या गजब गोष्टी

## लेखक : शरद जोशी


*एक झाड होतं. जुनं पुराणं. अगदी पोचलेलं साहित्य समीक्षक. त्याची साहित्यातली रुचीही एकदम क्लासिकल. साहित्यातल्या नवीन प्रवाहाविषयी विचारलं, तर एकदम गप्प होऊन जाई ते. पण का? शरद जोशींची ही खूप जुनी, पण 'नवी' व्यंगकथा वाचा, आणि या गुपिताचा उलगडा करून घ्या.*

तेवढ्यात एकाएकी झाडामधून आवाज आला, 'साहित्य समाजाचा आरसा आहे.' आम्ही सगळेजण आश्चर्यचकित झालो. जेवण झाल्यावर हॉस्टेलच्या मेसमधून चक्कर मारायला गेलो होतो. टिपूर चांदणं पडलं होतं. शहराकडे जाणारा रस्ता खूप सुंदर दिसत होता, चांदीचा लांबलचक पट्टाच जणू. झाडं वाऱ्यावर डोलत होती. एखाद्या कव्वालीच्या धूनवर ती डोलत टाळ्या वाजवत आहेत, असं वाटत होतं. ज्या विषयावर गप्पा चालू होत्या, त्याची सुरूवात जेवणाआधीच झाली होती. एका नुकत्याच प्रकाशित झालेल्या कांदबरीवरून चर्चा इतकी टोकाला गेली, की साहनी किंचाळून म्हणाला, " शेवटी साहित्य म्हणजे तरी काय?"

तेव्हा रस्त्याच्या कडेच्या एका जुन्यापुराण्या झाडातून आवाज आला, "साहित्य समाजाचा आरसा आहे."

आम्ही चपापून चारी दिशांना बघितलं, उत्तर देणारी कोणीही व्यक्ती तिथे नव्हती. झाडाच्या मागे किंवा झाडावरही कोणी नव्हतं.

धाडस करून गुप्ता म्हणाला, “कोण आहे रे तिकडे?”



काहीच उत्तर नाही. एखाद्या झपाटलेल्या भुताच्या गोष्टीची सुरूवात होतेय की काय, असं वाटलं.

“भूत आहे रे इकडे.”

आणि आम्ही सगळ्यांनी जी धूम ठोकली, ती नाल्याच्या पलीकडे जाऊनच श्वास घेतला. अर्धा एक तास झाडाच्या या जादूवर विचार केला आणि धीर एकवटून परत झाडाजवळ आलो.

साहनीने मोठ्या आवाजात विचारले, “ साहित्य म्हणजे काय?”

आणि झाडामधून गंभीर आवाज ऐकू आला, “साहित्य समाजाचा आरसा आहे.” आम्ही आश्चर्याने एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागलो.

“नवकविता काय आहे?” वर्माने विचारले.

“ऊँ...!” आणि झाड निरुत्तर झालं. आम्ही थोडा वेळ वाट पाहिली, पण झाड गप्पच राहिलं.

“काव्य म्हणजे काय?”

“वाक्यम् रसात्मकम् काव्यम्.” गंभीरपणे उत्तर आलं.

कॉलेजमध्ये जेव्हा हा अनुभव सांगितला, तेव्हा सारेजण हसू लागले. कोणी आम्हाला मूर्ख म्हटलं, तर कोणी आमच्या अंगावर ओरडले. जिथे आम्ही जावं, तिथे खिदळून आमचं स्वागत होई, की हे आले झाडातून आवाज ऐकणारे.

युनिव्हर्सिटी प्रेसचे अधीक्षक शर्माजी स्वत:ला मोठे वैज्ञानिक म्हणत असत. त्यांच्यापर्यंत ही गोष्ट जेव्हा पोचली, तेव्हा रात्रीच ते होस्टेलमध्ये आले आणि म्हणू लागले, “ दाखवा बरं, कोणत्या झाडातून आवाज येतोय ते. मी आत्ता ते भूत पळवून लावतो.”

आम्ही त्यांना झाडाजवळ घेऊन गेलो. प्रश्न विचारला, “काव्य म्हणजे काय?” आणि उत्तर मिळालं, “वाक्यम् रसात्मकम् काव्यम्.” शर्माजी दरडावून म्हणाले, “कोण आहेस तू बोलणारा?”

काहीच उत्तर आलं नाही.

“आणखी प्रश्न विचारा रे याला.”

“प्रगतीवाद म्हणजे काय?”

“हिंदीतले नवीन वळण.”

जुनापुराणं खडूस झाड होतं. प्रगतीवादाला नवीन वळण म्हणणारं.

"आणि प्रयोगवाद काय आहे?"

"ऊँ.*SSS..!*" एवढं म्हणून झाड गप्प झालं.

"छायावाद म्हणजे काय?"

"सूक्ष्माचे स्थूलाविरुद्ध बंड." उत्तर मिळालं.

ही अलौकिक प्रश्नोत्तरे शर्माजी आश्चर्यचकित होऊन ऐकत उभे होते. म्हणाले, "झाड बोलतंय ही एकदम विचित्र गोष्ट आहे. या झाडाला मी कित्येक वर्षांपासून ओळखतो. युनिव्हर्सिटी प्रेस नवीन इमारतीत जाण्यापूर्वी इथेच समोरच्या इमारतीत होता, तेव्हापासून." मग विचार करून ते म्हणाले, "गोष्ट काहीतरी विचित्र आहे खरी, पण कोणत्यातरी रासायनिक प्रक्रियेमुळे झाड विद्वान झालं, असं होऊ शकतं."


"म्हणजे काय?"

"आधी या झाडाजवळ एक खड्डा होता. आमच्या प्रेसचे रद्दी कागद, जुनी प्रुफं, वगैरे त्यामध्ये टाकलं जायचं. तेव्हा छापलेले काही प्रबंध आणि हिंदी साहित्याचा इतिहास या झाडाच्या मुळाशी गाडलेले आहेत आणि त्यामुळे हे झाड विद्वान झालं आहे."

"पण यातून आवाज का येतो?"

"पोटात पुस्तकं आहेत, तर तोंडातून आवाज निघणारच ना. विद्वान आहे, तर बोलणार जरूर. गप्प थोडाच बसेल." गुप्ताने शंका समाधान केले.

झाडाला आणखी एक प्रश्न विचारला, “हिंदीतली सर्वश्रेष्ठ साहित्यकृती कोणती आहे?”



उत्तर आलं, “कामायनी.”

“सर्वश्रेष्ठ नाटककार कोण आहे?”

“भारतेंदु हरिश्चंद्र”

“त्यांच्या नंतर?”

“प्रसादजी”

“त्यांच्या नंतर?”

“ऊँ.SSS..!” म्हणून झाड गप्प झालं.

“प्रेमचंद यांच्याबद्दल काय माहिती आहे?”

“ते ग्रामजीवनाचे चित्रकार होते.”

“सूर आणि तुलसी मध्ये श्रेष्ठ कोण आहे?”

*“सूर-सूर तुलसी ससी, उडुगन केसवदास। अबके कवि खद्योत सम, जँह-तँह करत प्रकास।*


*(साहित्यरूपी आकाशात कवी सूरदास सूर्यासारखे तर कवी तुलसीदास चंद्रासारखे प्रकाशत आहेत. कवी केशवदास म्हणजे तारांगण आहेत. आत्ता जे कवी आहेत, ते मात्र सारे काजव्यांसारखे थोडेफार चमकत, इकडेतिकडे दिसत असतात.)”*

“डब्ल्यू. एच. ऑडेन हे नाव ऐकलंय का?”

“ऊँ.*SSS*..!” एवढं म्हणून झाड गप्प झालं.

आत्तापर्यंत एवढं नक्की कळलं होतं, की क्लासिक स्वरूपाचे प्रश्न विचारा, क्लासिक उत्तर मिळेल. नवीन साहित्यावर विचारलं, तर झाड गप्प होऊन जाणार. शर्माजींनी केलेलं विश्लेषण बरोबर होतं. झाडाच्या मुळाशी जुने प्रबंध गाडलेले आहेत, त्यांचा रस पिऊन झाड विद्वत्तापूर्ण उत्तरं देतं.

काही दिवसांनंतर आम्ही सगळ्यांनी असं ठरवलं, की झाडाला वैचारिकदृष्ट्या अप-टू-डेट करावं. काही नवी पुस्तकं गोळा केली. सगळी नवीन साहित्यावर होती. स्वत: शर्माजींनी झाडाजवळ एक फुटाचा एक खड्डा खणला आणि त्यात ती पुस्तकं ठेवली गेली. नवीन पुस्तकांच्या खतामुळे झाड विद्वान होतं, ही गोष्ट जर सिद्ध झाली, तर विज्ञान विश्वात शर्माजींनाही आठ-दहा इंचाची जागा मिळाली असती.



दुसऱ्या दिवशी आम्ही तिथे जाऊन झाडाला प्रश्न विचारले, पण काहीच उत्तर मिळालं नाही. नक्कीच, झाड या वेळी मनन करत होतं, आणि क्लासिक प्रश्नांची

उत्तरं देण्याच्या मूडमध्ये नव्हतं. तिसऱ्या - चौथ्या दिवशीही असंच झालं. झाड कायमचं गप्प तर होणार नाही ना, अशी आम्हाला भीती वाटू लागली.

"शर्माजी, नवीन साहित्याच्या संपर्कात आल्यावर झाडाचं भान हरपलं आहे. मती गुंग झाली आहे त्याची. ते निशब्द झालं आहे. नवीन पुस्तकं बाहेर काढून टाकणे, हेच बरं राहील. म्हणजे, निदान उत्तरं ऐकण्याचा चमत्कार तरी नष्ट होणार नाही."

रात्री शर्माजींच्या नेतृत्वाखाली कुदळी घेऊन जेव्हा झाडाजवळ पोचलो, तेव्हा झाड आडवं खाली पडलेलं पाहून सर्वजण सुन्न झालो. आम्हाला फार दु:ख झालं, जणू काही आम्ही झाडाचा खूनच केला होता.

"या जुन्या झाडाच्या संपर्कात नवीन साहित्य यायलाच नको होतं. बिचाऱ्याला ते पचलं नाही. शॉक बसला त्याला. खुनी आहोत आपण सगळे याचे." वर्मा म्हणाला.

संगीतप्रेमी वृक्ष तर बरेच असतात. गाणी ऐकून ते छान वाढतात. साहित्यप्रेमी असं हे एकच झाड होतं. धाराशयी झालं बिचारं.



खाली मान घालून आम्ही सगळे परत आलो.

महिन्याभराने सुट्टीवर असलेले आमचे हिंदीचे विभागप्रमुख परत आले, तेव्हा आम्ही त्यांना हा सगळा किस्सा सांगितला. आधी त्यांना आश्चर्य वाटलं. पण नंतर त्यांनी अशी दैवी शक्ती असू शकते आणि झाड सुद्धा अशी उत्तरं देऊ शकतं, हे मान्य केलं.

साहनी हसून म्हणाला, “सर फार क्लासिक उत्तरं द्यायचं ते झाड. आम्ही विचारलं की, ‘सर्वश्रेष्ठ नाटककार कोण आहे?’, तर म्हणालं, ‘भारतेंदु हरिश्चंद्र.’ विचारलं की, ‘काव्य म्हणजे काय?’, तर म्हणे, ‘वाक्यम् रसात्मकम् काव्यम्.’. आम्ही विचारलं, ‘प्रगतीवाद म्हणजे काय?’, तर म्हणे, ‘हिंदीतलं नवीन वळण.’, ऐकून इतकं हसू येत असे.”

“यात चुकीचं काय म्हणालं ते झाड?” विभागप्रमुख म्हणाले, “बरोबरच आहे. प्रगतीवाद म्हणजे हिंदीतलं नवीन वळणच तर आहे. कवितेची सर्वश्रेष्ठ परिभाषा पंडितराज जगन्नाथांचीच तर आहे.”

“आणि प्रयोग....!” पण साहनी मध्येच थांबला.

““ॐ.*SSS*..!” विभागप्रमुख म्हणाले आणि मग काय कोण जाणे, काय विचार करत गप्प झाले.

आम्ही सगळेजण त्यांच्या खोलीतून बाहेर आलो. त्या संध्याकाळी आम्ही शपथ घेतली, की विभागप्रमुखांबरोबर नवीन साहित्यावर कधीही चर्चा करणार नाही, त्यांना कोणतेही पुस्तक देणार नाही आणि, प्रश्न विचारणार नाही. त्यांना दीर्घायुष्य चिंतत आम्ही असा निश्चय केला होता.

एक झाड मरण पावलं होतं, दुसरं झाड आता आम्ही मरू देणार नव्हतो.



*हिंदी संदर्भ अंक १६० (सप्टेंबर - ऑक्टोबर २०२५) मधून साभार.*

§§§

---

**लेखक : शरद जोशी (१९३१-१९९१)**, कवी, लेखक, व्यंगकथाकार, हिंदी चित्रपट आणि टेलिव्हिजन माध्यमाचे संवादलेखक व पटकथाकार. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विषयांवर अनेक व्यंगात्मक निबंध लिहिले आहेत. १९९० साली ‘पद्मश्री’ पुरस्काराने सन्मानित.

**चित्रे : अदिती दीक्षित**

**हिंदीतून अनुवाद : संजीवनी आफळे**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

***(कळीचे शब्द : कथा, story)***